महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ४८ वे | दिनांक : ०८/०२/२०२६ | वार : रविवार

## अजितदादांच्या निधनानंतर प्रचारात रस नाही - मुरलीधर मोहोळ



**पुणे** : केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुणे जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचाराबाबत महत्त्वपूर्ण विधान केले आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर आपल्याला प्रचारात रस नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "निवडणुका येतात आणि जातात, पण दादा गेल्याचे दुःख आमच्या मनात आहे," असे मोहोळ म्हणाले.

पुणे जिल्ह्याचे भाजप पक्षाचे प्रभारी असूनही आपण जिल्हा परिषद प्रचाराला कुठेही गेलो नसल्याचे त्यांनी सांगितले. अजित पवार जिल्ह्यात 35 ते 40 सभा घेणार होते, मात्र दुर्दैवी घटनेनंतर परिस्थिती बदलली आहे. "राजकारण करायला आयुष्य आहे, अशावेळी प्रचार करणे योग्य वाटले नाही," असे मत त्यांनी व्यक्त केले. मतदार सुज्ञ असून ते योग्य निर्णय घेतील, असेही मोहोळ म्हणाले.

शरद बुट्टे पाटील यांना झालेल्या मारहाणीच्या घटनेवर बोलताना मोहोळ म्हणाले की, ते पहाटे दिल्लीहून आले आहेत. या घटनेमागील नेमके कारण जाणून घेतल्यानंतरच आपण यावर अधिक बोलू, असे त्यांनी नमूद केले.

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील वाहतूक कोंडीबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. "हे सगळे भयानक होते," असे सांगत भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.

अजित पवार यांच्या अपघाताच्या चौकशीबाबत माहिती देताना मोहोळ यांनी सांगितले की, ब्लॅक बॉक्स सापडला आहे. एआयबीची (Aircraft Accident Investigation Bureau) टीम यावर काम करत असून, डेटा डाउनलोड केला जात आहे. संपूर्ण विश्लेषणानंतर लवकरच अहवाल समोर येईल. या विषयावर कोणीही राजकारण करू नये, अशी विनंतीही त्यांनी केली.

बजरंग सोनवणे यांनी केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना मोहोळ म्हणाले की, राज्याचा आणि पुणे जिल्ह्याचा इतका मोठा नेता गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. अशा दुःखद प्रसंगी राजकारण करणे योग्य नाही. चौकशी होईल आणि अहवाल येतील. मुख्यमंत्री स्वतः या प्रकरणात लक्ष घालत असून, सीआयडी, डीजीसीआय आणि एआयबी या यंत्रणा काम करत आहेत.

पुणे महापालिकेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, गेल्या तीन-चार वर्षांपासून शहराला प्रतिनिधी नव्हते. आता नवीन व्यवस्था येत असून, आपली जबाबदारी वाढली आहे. पाणीपुरवठा आणि वाहतूक यांसारख्या समस्यांवर काम करून पुण्याला देशातील सर्वोत्तम शहर बनवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

## तेलंगणात महात्मा फुलेंची मूर्ती तोडण्याचा प्रयत्न म्हणजे दलित, आदिवासी, ओबीसींवर हल्ला - प्रकाश आंबेडकर



**मुंबई** :तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लापूर गावात महात्मा जोतिबा फुले यांची मूर्ती तोडण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमागे आरएसएसचा हात असल्याचा खळबळजनक आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. "हा केवळ जोतिबा फुलेंवर झालेला हल्ला नसून, तो दलित, आदिवासी, ओबीसी आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीवर झालेला हल्ला आहे," अशा शब्दांत प्रकाश आंबेडकरांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

या घटनेवर प्रतिक्रिया देताना प्रकाश आंबेडकर यांनी आरएसएसवर घणाघाती टीका केली. ते म्हणाले, " आरएस-एसला महात्मा जोतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेशी द्वेष आहे. वंचित आणि बहुजनांच्या समतेच्या आंदोलनाला चिरडण्याचा हा प्रयत्न आहे. आरएसएसला दलित, आदिवासी आणि ओबीसींबद्दल आकस आहे; त्यांना केवळ मनुवाद आणि ब्राह्मणवादाचेच प्रेम आहे."

प्रकाश आंबेडकर यांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. "रेवंत रेड्डी, तुमच्या राज्यात महापुरुषांच्या मूर्तींवर झालेला हा काही पहिलाच हल्ला नाही. वारंवार अशा घटना घडत असताना तुम्ही हातवर हात धरून का बसला आहात? सरकार या गुंडांवर कडक कारवाई का करत नाही?" असा सवाल प्रकाश आंबेडकर यांनी केला.

## १२ झेडपी, १२५ पंचायत समित्यांसाठी आज झाले मतदान




**मुंबई** :राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणु-कांसाठी आज मतदान झाले. छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत ही प्रक्रिया पार पडली. अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे 5 फेब्रुवारी रोजी होणारे हे मतदान आजपर्यंत पुढे ढकलण्यात आले होते.

आज सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान झाले. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. आजच्या मतदान प्रक्रियेसाठी २५,४७१ मतदान केंद्रे उभारण्यात आली. जिल्हा परिषदेच्या ७३१ गटांसाठी व पंचायत समितीच्या १,४६२ गणांसाठी असे एकुण ७,४३८ उमेदवार रिंगणात आहेत.

## बजरंग दलावर तात्काळ बंदी घाला - अंजुम इनामदार

**पुणे** : पुण्यात मूलनिवासी मुस्लिम मंचाने बजरंग दलवर तात्काळ बंदी घालण्याची मागणी केली आहे. उत्तराखंडमधील कोटद्वार येथे एका मुस्लिम दुकानदाराला दुकानाचे नाव बदलण्यासाठी धमकावल्याच्या घटनेनंतर हे आंदोलन करण्यात आले.

अंजुम इनामदार यांनी सांगितले की, कोटद्वारमध्ये बजरंग दलच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर जमाव करून कायदा हातात घेतला. त्यांनी 'नाव बदला, नाहीतर परिणाम भोगा' अशा धमक्या दिल्या. या दहशतीला विरोध करत दीपक कुमार नावाच्या व्यक्तीने 'माझं नाव मोहम्मद दीपक आहे, भारतात नाव आणि धर्मावरून कुणावरही बळजबरी चालणार नाही' असे ठामपणे सांगितले.

संविधानाचा आवाज उठवणाऱ्या दीपक कुमार यांच्यावर बजरंग दलच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केल्याचा आरोप इनामदार यांनी केला. उत्तराखंडमध्ये यापूर्वीही ख्रिश्चन आणि मुस्लिम अल्पसंख्याक समाजावर अत्याचार, धमक्या आणि मारहाणीच्या घटना घडल्याचे त्यांनी नमूद केले.

या आंदोलनात भोला सिंग अरोरा (अध्यक्ष, गुरुद्वारा गणेश पेठ), राजन नायर (ईसाई महासंघ), सगई नायर, भीम आर्मी संघटनाचे प्रदेश नेते अँड. तोसीफ शेख, अँड. क्रांती सहाने, आसमा शेख, हलीमा शेख, सलीम मौला पटेल, इब्राहिम यवतमाळवाला, सत्यवान गायकवाड, सलीम शेख, मोईन शेख, गोविंद साठे आदी सहभागी झाले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ फेब्रुवारी २०२६


## कालिकादेवी विद्यालयात निरोप समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न...



**बीड (शिरूर कासार) :** आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित,कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर(का. )जि. बीड येथे इ.10 वी व 12 वीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचा कार्यक्रम भव्य-दिव्य स्वरूपात व मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेब,प्रमुख अतिथी बीड येथील पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पल्लवी जाधव मॅडम,शिरूर पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक मा. श्री प्रवीण जाधव साहेब,वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे साहेब,माजी प्राचार्य व्ही.जी. काटे सर,बीड पोलीस-दामिनी पथकातील श्रीमती जाधव मॅडम, श्रीमती चौरे मॅडम,पत्रकार विजयकुमार गाडेकर पाटील या मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून लोकनेत्या स्व. केशरबाई (काकू)क्षीरसागर व लोकनेते स्व. सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमां पूजनाने या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. व मान्यवरांच्या सत्कारानंतर विद्यार्थी वक्ते चि.शोएब आतार, कु.आराध्या गिते,कु.सुप्रिया भाबड,कु.प्रगती तळेकर यांनी आपल्या मनोगतातून अनुभव आणि आठवणी सांगून सर्व रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.तर सहा.पोलीस निरीक्षक मा.श्री प्रवीण जाधव साहेब यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना अभ्यास,गुणवत्ता आणि सोशल मीडियाचा गैरवापर होणार नाही. याविषयी मार्गदर्शन केले.तर बीडच्या पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पल्लवी जाधव मॅडम यांनी आपल्या भाषणातून,विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यासाठी व भवितव्यासाठी विविध स्पर्धा परीक्षा, शाळा महाविद्यालयातील मुलींची छेडछाड, बालविवाह, बालगुन्हेगारी का? वाढते त्याची कारणे व त्यावर उपायोजना म्हणजे विद्यार्थ्यांनी चांगल्या गोष्टीचे अवलोकन करण्यासाठी उपयुक्त असे विविध सल्ले दिले.तर माजी प्राचार्य व्ही. जी. काटे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे सर यांनी दहावी व बारावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभाच्या शुभेच्छा देऊन पुढील वाटचालीसाठी दिशादर्शन केले. तर अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी सांगितले की,'निरोप समारंभ' या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक व सहा. पोलीस निरीक्षक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील प्राचार्य, प्राध्यापक, विविध क्षेत्रातील मान्यवरांना येथे प्रमुख अतिथी म्हणून बोलवत असताना, या मान्यवराकडे पाहून आपणही अशा उच्च पदस्थ आणि मोक्याच्या जागा मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी. आमच्यासारखे मोठे होऊन आपले नाव उज्वल करावे. हा या पाठीमागंचा उद्देश होता. हे स्पष्ट करून येणाऱ्या बोर्डाच्या परीक्षेमध्ये अभ्यास करून सदसद विवेकाने गुणवत्ता संपादन करावी व आपलं जीवन सार्थकी लावावं असेही सूचित केले. यावेळी कालिकादेवी महाविद्यालयातील सर्व वरिष्ठ प्राध्यापक, कनिष्ठ प्राध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच शिरूर (का.) तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक, आमंत्रित सर्व पालक वर्ग, युवकवर्ग आणि विद्यार्थी यांची प्रचंड संख्येने उपस्थिती होती.

## शरण पाटील यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भुसणी, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जाऊन उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांनी शनिवारी (ता. 7) रोजी आपला मतदानाचा हक्क बजावला.यावेळी त्यांनी मतदारांना आवाहन करताना म्हणाले की , लोकशाही मजबूत करण्यासाठी केवळ चर्चा करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान करणे गरजेचे आहे. आपले एक मत गावाचा आणि तालुक्याचा विकास ठरवू शकते. मतदान हा केवळ अधिकार नसून, ते प्रत्येक नागरिकाचे संविधानिक कर्तव्यच आहे. त्यामुळे प्रत्येक मतदारांनी घराबाहेर पडा आणि लोकशाहीच्या या उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. फोटो : शरण पाटील मतदान केंद्रात आपला मतदानाचा हक्क बजावताना...

## "त्या" अपघात प्रकरणी कार चालकाविरूध्द गुन्हा दाखल





**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) -** औरंगाबाद महामार्गावरील गणेशपूर - देवगाव फाटा नजीक दोन कारचा भिषण अपघात झाला या अपघातात परभणी येथील दोघेजण ठार झाले होते. तर इतर तिन जण गंभीर रित्या जखमी झाल्याची घटना मंगळवार दि २ मध्यरात्री एकच्या सुमारास घडली होती. परभणी येथील अस्ट्रो कार क्रंमाक एमएच २२ ए डब्लु ५११५ या कार मधील चौघे जण औरंगाबाद येथे लग्नपत्रीका वाटण्यासाठी गेले होते. काम अटोपून परभणी कडे येत असताना ब्रिझा कार क्र॑माक एमएच १४ एफ.एस ०८९७ हि जिंतूर येथून मंठा येथे जात होती. दरम्यान या दोन्ही वाहनाचा गणेशपूर - देवगाव फाटा जवळ समोरा - समोर भिषण अपघात झाला होता.अपघातात परभणी येथील ज्येष्ठ पत्रकार नितीन कुमार धूत वय ६५ वर्षे रा. परभणी हे जागीच ठार झाले तर जिंतूर साहयक निंबधक संजय आब्दगिरे यांचा उपचारा दरम्यान मृत्यु झाला. तर जखमी मध्ये ॲड मनोज तोष्णीवाल वय ५५ वर्षे रा. परभणी, विजय ताडकळसकर वय ६५ रा. परभणी तर ब्रिझा कार मधील एक जण जखमी झाला दरम्यान दि ३ रोजी अपघातील जखमी विजय ताडकळसकर रा. परभणी याच्या फिर्यादीवरून कार क्र॑माक एमएच १४ एफ.एस ०८९७ चा चालक (नाव माहित नाही) याच्या विरूध्द चारठाणा पोलीस ठाण्यात कलम १०६,( १ ) २८१ , १२५,( ए ) १२५ ( बि) बिएनएस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास सपोनी मुंजाजी दळवे हे तपास करीत आहेत.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिंग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ फेब्रुवारी २०२६


## पक्ष्यांचे स्नेहसंमेलन

पक्ष्यांच्या शाळेत
स्नेहसंमेलन सुरू झाले
शाळेतील सर्व पक्षी
कला दाखवू लागले

डोईवरचा तुरा हलवित
नाचू लागला मोर
पिसारा त्याने फुलविला
लावून सारा जोर

नक्कल करे पोपट
घालून हिरवा कोट
हसू आले सर्वांना
दुखू लागले पोट

कोकिळा गाऊ लागली
हळूच गोड गाणी
दूरवर सूर निनादे
हिरव्या हिरव्या रानी

पांढरा पोशाख घालून
आला बगळेदादा
मान उंचावून म्हणाला
स्वच्छता ठेवा सदा

कावळ्याने काढला मग
मोठ्याने कर्कश गळा
बघणारे सर्व म्हणाले
आता पळा रे पळा !




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106


## वाट

आता एकटाच ! चालतोय वाट!
आयुष्याचा घाट!चढणीचा!!

वाटेवरी झाडे! हरवले आता!
उन्हाचा तडाखा! वाढलेला!!

उन्हाच्या झळानी! वाटा तापलेल्या!
टाचा रापलेल्या! प्रवासाने !!

वाट अडवण्या! दगड अन् धोंडे!
मेंढराचे लोंढे!उगाचच!!

वाटेवर आता! सावध चालणे!
क्षितिज भेदने! ठरलेले!!




ज्ञानेश्वर गायके,
कन्नड


# कला महाविद्यालयाच्या एनएसएसचे सात दिवसीय निवासी शिबीर संपन्न



**बिडकीन (प्रतिनिधी)** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर सलग्नित, एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ,कला महाविद्यालय बिडकीन येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) अंतर्गत "पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन शाश्वत विकासासाठी युवा" या संकल्पनेवर आधारित सात दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश गायकवाड यांनी केले .सदर शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा नोडल अधिकारी डॉ. अनंत कनगरे यांच्या हस्ते संपन्न झाले.डा ॅ.कणगरे सरांनी राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठ अंतर्गत वेगवेगळ्या कॅम्पचे आयोजन करण्यात येते या आयोजनामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःला झोकून घ्यावे असे मार्गदर्शन केले त्याचबरोबर उद्घाटनासाठी एकता शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी शेख मुसा सर आणि डॉ. जितेंद्र शेजवळ यांनी शुभेच्छा दिल्याउद्घाटनप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक डॉ. नवनाथ आघाव यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची प्रभावी चळवळ असून समाजसेवा, नेतृत्वगुण, शिस्त आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यात एनएसएसचे मोलाचे योगदान असल्याचे प्रतिपादन केले. “विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच समाजाच्या प्रश्नांशी स्वतःला जोडले पाहिजे,” असे आवाहन त्यांनी यावेळी केले.या सात दिवसीय निवासी शिबिरादरम्यान स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, जलसंधारण विषयक जनजागृती, व्यसनमुक्ती अभियान, पर्यावरण संवर्धन, आरोग्य व स्वच्छता विषयक प्रबोधन, संविधान मूल्यांवर आधारित चर्चासत्रे तसेच सामाजिक विषयांवरील मार्गदर्शनपर व्याख्याने घेण्यात येणार आहेत. शिबिरार्थींनी परिसरातील सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, मंदिरे व शासकीय कार्यालयांच्या परिसराची स्वच्छता करून स्वच्छतेचा संदेश देण्याच्या दृष्टिकोनातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे सदरशिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन आहेर यांनी अध्यक्षीय भाषण केले व महाविद्यालयाची परंपरा आणि उपक्रम यांच्या विषयी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.मिलिंद ठोकळे यांनी केले.कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मिलिंद ठोकळे व डॉ. रमेश गायकवाड यांनी केले शिबिराच्या समारोपप्रसंगी सहभाग घेतलेल्या स्वयंसेवकांचे कौतुक करण्यात आले असून, समाजसेवेची ही परंपरा पुढेही कायम ठेवण्याचा निर्धार करण्यात आला या शिबिराच्या यशस्वीतेसाठी महाविद्या-लयातील डॉ. युसुफ पठाण, डॉ.रामकिसन मुंडे डॉ. मुक्तार शेख, डॉ. अर्चना काटकर , डॉ .प्रसाद करंदीकर ,डॉ.वैशाली पेरके डॉ. अंजली काळे प्रशासकीय अधिकारी अण्णासाहेब थिटे संभाजीराव आंधळे शेख नशीर यांनी अतिशय मेहनत घेतली. शेवटी आभार प्रदर्शन डॉ.सय्यद सर यांनी केले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हुन अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103 8830838903


# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ फेब्रुवारी २०२६


## तोफखाना केंद्रीय विद्यालयाचा वार्षिक क्रीडा दिवस जल्लोषात साजरा; शिवाजी सदनचे वर्चस्व





**नाशिक रोड (प्रतिनिधी ) :** शहरातील तोफखाना केंद्रातील पीएम श्री केंद्रीय विद्यालय क्रमांक १, नाशिक रोड कॅम्पच्या मैदानावर वार्षिक क्रीडा दिन अत्यंत जल्लोषात आणि खिलाडूवृत्तीने साजरा करण्यात आला. फिट इंडिया मूव्हमेंट, खेलो इंडिया आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चा आधारभूत विचार पुढे ठेऊन आयोजित केलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या क्रीडा कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. या सोहळ्यासाठी तोफखाना केंद्राचे कमांडंट तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष ब्रिगेडियर एन.आर. पाण्डेय मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य श्री. गजराज मीना यांनी त्यांचे जंगी स्वागत केले. यावेळी आर्मी फॅमिली वेल्फेयर असोसिएशनच्या अध्यक्षा अनिता पाण्डेय, मानव संसाधन विकास केंद्र अधिकारी विक्रांत काळे यांची विशेष उपस्थिती होती. मुख्य अतिथी ब्रिगेडियर एन.आर. पाण्डेय यांनी आपल्या भाषणात खेळाडूंचे कौतुक करताना सांगितले की, "खेळाचे मैदान हे केवळ विजयासाठी नसून नेतृत्व आणि जिद्द शिकण्यासाठी असते. मन, बुद्धी आणि शरीर यांच्या ताळमेळातून आकाशाला गवसणी घालण्याची कुवत प्राप्त होते." असे प्रेरणादायक विचार त्यांनी पेरले. प्राचार्य गजराज मीना यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात खेळांचे महत्त्व अधोरेखित केले. क्रीडा स्पर्धांच्या सुरुवातीस उद्घाटन पर सांस्कृतिक कार्यक्रमाचा आरंभ मधूर अशा स्वागतगीताने झाला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी चित्ताकर्षक योग नृत्य सादर केले. पाचवीचा विद्यार्थी निवेन रॉय याने थिरकते नृत्य सादर केले. एनसीसी व शिवाजी, टागोर, अशोक आणि रमण या चारही सदनांच्या शिस्तबद्ध मार्च पास्टने उपस्थितांमध्ये जोष भरला. प्राथमिक विभागाचे खेळ: प्राथमिक विभागातील चिमुकल्यांनी पोते उडी, पेन्सिल शर्यत आणि शाळेसाठी तयार होण्याच्या शर्यतीत भाग घेऊन उपस्थितांची मने जिंकली. विशेष गरजा असलेल्या मुलांनी ही आनंदाने स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. क्रीडा कौशल्याचे दर्शन:मुलामुलींच्या १०० मीटर आणि ४ बाय १०० मीटर रिले धावण्याच्या शर्यतींनी मैदानात चुरस निर्माण केली. स्पर्धांचा शेवट शिक्षकाच्या धावण्याच्या शर्यतीने झाला. या स्पर्धेत ज्ञानेश्वर सरताळे यांनी बाजी मारली. मागील वर्षी ही तेच या स्पर्धेचे विजेते होते. बक्षीस वितरण समारंभात शिवाजी सदनने सर्वाधिक गुण मिळवून सर्वसाधारण विजेतेपदाचे चषक पटकावले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदके देवून सन्मानित करण्यात आले. स्पर्धाच्या यशस्वीतेसाठी कल्पना शिंदे, उज्ज्वला चांदोरकर, अमीत कुमार शुक्ला, सुदर्शन गुप्ता, इंदु कुमार सोनबोईर, रोहित गौड, तुषार वारडे, अविनाश पवार, आरीफ बेग, सागर काठोळे, स्वाती सोनुले, शुभम यादव, अरविंद लोखंडे, आविष्कार धिवरे, आदींसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## टॅरिफच्या सावल्या, मातीचा दिवा

टॅरिफच्या सावल्या पसरल्या दूरवर,
करांच्या रेषांनी वाकल्या दिशा पसरून।
सभांमध्ये फिरती आकड्यांची भाषा,
शेतात धडधडती उद्याची आशा।

दबावांच्या वाऱ्यांनी निर्णय डळमळती,
मातीच्या मनाला किमतीच कळती।
कोणाचा लाभ, कोणाची हानी,
विवेक उघड करी खरी कहाणी।

ना आंधळी स्तुती, ना आंधळी टीका,
प्रश्न विचारणं ही लोकशाहीची नीतीका।
माहिती-संवादाची उजळ वाट,
त्यांनीच सुटती गुंत्यांची गाठ।

अन्नदात्याच्या घामाला द्या मान,
न्याय्य बाजार, सुरक्षित स्थान।
जगाशी नाते ठेवा समतेचे,
घरचे हित जपा - धैर्य विवेकाचे।

एकजुटीने मागू उत्तरं स्पष्ट,
धोरणांत दिसो जनहित निखळ, स्पष्ट।
मातीचा दिवा राहो प्रज्वलित,
ज्ञानाने भवितव्य होवो प्रकाशित।

**प्रभाकर गायकवाड**
छत्रपती संभाजीनगर


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क 9405109103


## माय एफ एम ९४-३ तर्फे महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी शाळेत विकसित भारत विषयावर चित्रकला स्पर्धा



**मुकुंदवाडी** : मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळा मुकुंदवाडी छत्रपती संभाजी नगर येथे माय एफ एम ९४.३ यांच्या तर्फे विकसित भारत या विषयावर शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी सर यांच्या मार्गदर्शना खाली चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यावेळी सर्व शिक्षक वृंद व माय एफ एम चे कर्मचारी उपस्थित होते या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आनंददायी शनिवार मोठ्या आनंदात साजरा करता आला


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ फेब्रुवारी २०२६

# यूजीसी इक्विटी बिल आणि बहुजनांच्या अस्मितेची लढाई

जानेवारी २०२६ च्या कडाक्याच्या थंडीत उत्तर भारतातील विद्यापीठ परिसरांचा राजकीय पारा 'उच्च शिक्षण संस्थांमध्ये समता संवर्धन विनियम' (UGC Equity Regulations) मुळे अचानक वाढला आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या (JNU) ढाब्यावरील चहाच्या चर्चेपासून ते अलाहाबाद विद्यापीठाच्या छात्रसंघ भवनापर्यंत, हा दस्तऐवज सध्या चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. एकीकडे बहूजन विद्यार्थी संघटना याला रोहित वेमुला आणि पायल तडवी यांच्या संघर्षाची फलश्रुती आणि सामाजिक न्यायाचा एक मोठा विजय मानत होत्या, तर दुसरीकडे 'जनरल कॅटेगरी' वर्गाचा एक गट याला 'काळा कायदा' संबोधून याच्या विरोधात रस्त्यावर उतरला आहे. बनारस हिंदू विद्यापीठाच्या (BHU) लंका गेटपासून ते पाटणा आणि दिल्ली विद्यापीठाच्या गल्लीबोळांपर्यंत, ही अधिसूचना केवळ एक प्रशासकीय आदेश न राहता अस्मितेच्या लढाईचे माध्यम बनली आहे. या मुद्द्याच्या ऊर्जेचा अंदाज यावरूनच लावता येतो की, गेल्या पाच वर्षांपासून उत्तर प्रदेशात योगींच्या राजवटीत छात्रसंघ निवडणुका झाल्या नाहीत, कोणताही छात्रसंघ अस्तित्वात नाही, तरीही विद्यार्थी हजारोंच्या संख्येने स्वतःहून रस्त्यावर उतरत आहेत.हा आता सामाजिक मुद्दा बनला आहे. दरम्यान, माननीय न्यायालयाने या नियमावलीच्या अंमलबजावणीवर लावलेल्या अंतरिम स्थगितीने (Stay) कॅम्पसमधील या तणावाला एक नवीन आणि गुंतागुंतीचे वळण दिले आहे. न्यायालयाच्या या हस्तक्षेपाला एक पक्ष आपला नैतिक विजय मानत आहे, तर दुसरीकडे याला वंचित वर्गाच्या घटनात्मक अधिकारांना रोखण्याचे कारस्थान म्हणून पाहिले जात आहे. १३ जानेवारीच्या या अधिसूचनेने आणि त्यानंतर सुरू झालेल्या कायदेशीर लढाईने भारतीय विद्यार्थी राजकारणाला दोन स्पष्ट ध्रुवांमध्ये विभागले आहे. आता हा संघर्ष केवळ हॉस्टेल आणि रस्त्यांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर संविधान, गुणवत्ता (मेरिट) आणि आरक्षणाची जुनी वैचारिक लढाई पुन्हा एकदा न्यायालयाच्या दारातून जाऊन देशाच्या भविष्याची दिशा ठरवण्यास आतुर आहे.रॉल्सचा 'केक' आणि वाटणाऱ्यांची नियतया संपूर्ण वादाच्या केंद्रस्थानी जॉन रॉल्सची 'डिस्ट्रिब्युटिव्ह जस्टिस' (वितरणात्मक न्याय) ही थ्योरी आठवते, ज्यामध्ये केक कापण्याचे उदाहरण दिले आहे. रॉल्स म्हणतात की, जर कोणाला आधीच सांगून केक कापायला सांगितले तर तो आपल्या वाट्याला जास्त केक कापतो. परंतु जर त्याला हे माहित नसेल की त्याला कोणता तुकडा मिळेल, तर तो समान तुकडे कापतो. भारतीय विद्यापीठांमध्ये 'केक' (संसाधने, पदे आणि सन्मान) वाटणारे जे लोक शीर्षस्थानी बसले आहेत, त्यांची प्रत्यक्षात हा केक सर्वांमध्ये वाटण्याची इच्छाच नाही. त्यांना आपले वर्चस्व टिकवून ठेवायचे आहे, जे आपल्याला पीएचडी प्रवेशापासून ते प्राध्यापकांच्या नियुक्त्यांपर्यंत पाहायला मिळते. उत्तर भारताच्या विद्यापीठांमध्ये गेल्या २५ वर्षांत एक अनोखे आणि विरोधाभासी विद्यार्थी आंदोलन पाहायला मिळाले आहे. हे आंदोलन आता दोन स्पष्ट भागांत विभागले गेले आहे. एक जो सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगितीपूर्वीचा होता, आणि दुसरा जो स्थगितीनंतर सुरू झाला आणि सतत व्यापक स्वरूप घेत आहे, ज्याला मुख्य प्रवाहातील मीडिया (मेनस्ट्रीम मीडिया) दाखवणे टाळत आहे. जेव्हा 'जनरल कॅटेगरी वर्गाचे' विद्यार्थी रस्त्यावर आले, तेव्हा अवघ्या दोन दिवसांत न्यायालयातील सुनावणीदरम्यान नवीन 'यूजीसी इक्विटी बिल'ला स्थगिती देण्यात आली. हा तोच काळ होता जेव्हा 'हिंदू हृदय सम्राट' म्हटले जाणारे नरेंद्र मोदी रातोरात 'सवर्ण' आंदोलकांसाठी केवळ 'तेली' बनले; निदर्शनांमध्ये घोषणा देण्यात आल्या की 'तेलिया तेल लगा दिया'. गोंडामध्ये तर अशा घोषणा देण्यात आल्या की 'मोदी तेरी कब्र खुदेगी यूजीसी की धरतीपर', परंतु त्यांच्यावर कोणताही खटला भरला गेला नाही, त्यांची कोणतीही मीडिया ट्रायल चालली नाही. याउलट, जेव्हा अशाच प्रकारच्या घोषणा जेएनयूमध्ये देण्यात आल्या, तेव्हा विद्यार्थ्यांवर खटल्यांची मालिकाच लावली गेली आणि विद्यापीठ प्रशासन त्यांना 'फ्रिंज एलिमेंट' (विघातक घटक) घोषित करू लागले. हा विरोधाभास असे दर्शवतो की, भारतात जनरल कॅटेगरी वर्गासाठी सरकारकडे वेगळा कायदा आहे. तसेच जनरल कॅटेगरीच्या आंदोलनात दिलेल्या घोषणा दर्शवतात की त्यांच्यासाठी 'क्लास' (वर्ग) महत्त्वाचा नाही, त्यांच्यासाठी तुमची ओळख तुमची 'जातच' राहील. तुम्ही पंतप्रधान व्हा किंवा 'अप्पर क्लास' मध्ये सामील व्हा, परंतु यथास्थितीवादी (Status Quo) विचारांसाठी तुम्ही 'तेलियाच' राहाल, मागासच राहाल. याच विचारांविरुद्ध हा नियम आला होता. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचीही हीच अवस्था झाली, त्यानाही उजव्या विचारसरणीच्या लोकांनी 'ओबीसी' असल्यामुळे जातीवाचक शिव्या दिल्या.राजकीय इच्छाशक्तीचा अभावइतिहास साक्ष आहे की, जेव्हा सरकारचा हेतू निर्मळ असतो, तेव्हा कायदे न्यायालयांत अडकत नाहीत. जेव्हा ईडब्ल्यूएस (EWS) आरक्षण आणले गेले, तेव्हा त्यालाही न्यायालयात आव्हान दिले गेले, पण ते थांबले नाही. व्ही. पी. सिंग यांच्या काळात जेव्हा ओबीसी आरक्षण आले, तेव्हा प्रचंड विरोधानंतरही ते लागू झाले, न्यायालयात आव्हान दिले गेले पण ते थांबले नाही. परंतु यूजीसीचा हा इक्विटी नियम जो पहिल्यांदा अधिकृतपणे हे मान्य करत होता की, ओबीसी विद्यार्थ्यांसोबतही कॅम्पसमध्ये भेदभाव होतो, तो न्यायालयात रद्द ठरविण्यात आला. यावरून हे स्पष्टपणे दिसून येते की, विद्यमान सरकारची या नियमाबाबत कोणतीही ठोस राजकीय इच्छाशक्ती नव्हतीच. हा नियम प्रत्यक्षात मागासवर्गीयांना दिलेले एक 'लॉलीपॉप' होते, ज्याचा उद्देश विद्यार्थ्यांना मूलभूत मुद्द्यांपासून भरकटवून आपापसात लढवणे होता. सरकारने असा एक दुबळा नियम मांडला जो कायदेशीर निकषांवर टिकूच शकणार नाही, जेणेकरून सवर्ण आणि ओबीसी विद्यार्थी एकमेकांशी भिडतील आणि सत्ता सुरक्षित राहील. जर मोदी सरकार खरोखरच 'बहुजन हितैषी' असेल, तर त्यांनी हा नियम यूजीसीच्या मागील दाराने का आणला? आंदोलन करणारे विद्यार्थी ही मागणी करत आहेत की, हा नियम संसदेत एक पूर्ण 'विधेयक' म्हणून आणला जावा. जोपर्यंत हे संसदेतून मंजूर झालेला कायदा बनणार नाही, तोपर्यंत याला केवळ एक 'राजकीय स्टंट' मानले जाईल.'शिकारी' आणि 'शिकार' यांचा दृष्टिकोनजे लोक असा तर्क देतात की 'भारतात आता जातिभेद होत नाही' किंवा 'आम्ही कधीही मागासवर्गीयांसोबत भेदभाव केला नाही', त्यांच्यासाठी आफ्रिकन इतिहासकार चिनुआ अचेबे यांचे हे मत लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, इतिहासाकडे केवळ शिकाऱ्याच्या नजरेतून पाहू नका, तर तो शिकार होणाऱ्याच्या नजरेतूनही पहा, तेव्हाच खरे सत्य समजते. विद्यापीठात एक एससी/एसटी/ओबीसी विद्यार्थी काय भोगतो, हे तोच जाणतो. एखादा विद्यार्थी विद्यापीठात टॉप जरी आला, तरी त्याला 'कोट्यावाला' (आरक्षणाचा लाभधारक ) असेच म्हटले जाते. सामाजिक भेदभाव अदृश्य म्हटला जात असला तरी तो खोलवर आहे. केंद्रीय विद्यापीठांमध्ये ओबीसींच्या ८०% जागा रिक्त असणे हा या भेदभावाचा सर्वात मोठा दस्तऐवजी पुरावा आहे. कागदावर पाहिले तर २०२६ चे नियम ऐतिहासिक वाटतात. २०१२ चे नियम केवळ 'सल्लागार' (Advisory) स्वरूपाचे होते, परंतु २०२६ चे हे नियम 'अनिवार्य' (Mandatory) करण्यात आले होते. यामध्ये तक्रारीनंतर २४ तासांच्या आत बैठक आणि १५ दिवसांत तपास पूर्ण करण्याची तरतूद होती. परंतु याचा विरोध एका विशिष्ट व्याख्येवर केंद्रित करण्यात आला. नियम ३(c) मध्ये म्हटले गेले की जातीय भेदभाव आरक्षित वर्गांच्या विरोधात होतो.'सवर्ण' याला समानतेचे उल्लंघन म्हणत आहेत, पण त्यांना हे समजत नाही की जात ही सत्तेची एक संरचना आहे. एका सवर्ण विद्यार्थ्याला त्याच्या आडनावामुळे कधीही 'अशुद्ध' मानले गेले नाही. त्याला या कारणास्तव कुठेही खोली देण्यास मनाई केली गेली नाही. परंतु या नियमाचा खरा 'खेळ' त्याच्या अंमलबजावणीमध्ये आहे. नियम म्हणतो की 'समता समिती'चा अध्यक्ष कुलगुरू (VC) असेल. आपल्याला माहित आहे की गेल्या दशकात कुलगुरूंची नियुक्ती कोणत्या आधारावर झाली आहे. काय एखादा पक्ष कार्यकर्त्यासारखा काम करणारा कुलगुरू आपल्याच विचारधारेच्या प्राध्यापकावर कारवाई करेल? हा कायदा आपल्याला कागदावर सामर्थ्यवान बनवतो, परंतु जमिनीवर आपल्याला त्याच प्रशासनासमोर गयावया करायला भाग पाडतो जे स्वतः या व्यवस्थेचा भाग आहे. या नियमात संस्थेच्या प्रमुखाला (कुलगुरू किंवा प्राचार्य) पदसिद्ध अध्यक्ष बनवले गेले आहे, तर प्रत्यक्षात पदसिद्ध अध्यक्ष एखाद्या बाह्य व्यक्तीला बनवायला हवे होते.सामायिक शत्रू ओळखाआज उत्तर भारतातील विद्यापीठांमध्ये सामायिक दुःख नाहीसे झाले आहे. विद्यार्थी आता 'फी वाढ' किंवा 'बेरोजगारी'वर बोलत नाहीत, तर यूजीसीचा नियम योग्य की अयोग्य यावर लढत आहेत. सत्तेला तर हेच पाहिजे आहे. जोपर्यंत विद्यार्थी आपापसात जातीच्या नावावर लढतील, तोपर्यंत कोणीही सरकारला विचारणार नाही की लायब्ररीत पुस्तके का नाहीत किंवा नोकऱ्या का संपवल्या जात आहेत. ही लढाई सवर्ण विरुद्ध अवर्ण अशी नाही, तर 'शिक्षण विरुद्ध सत्ता' अशी आहे. सवर्ण विद्यार्थ्यांनी हे समजून घेतले पाहिजे की त्यांचा हक्क दलित विद्यार्थी हिरावून घेत नाहीये, तर ते खासगीकरण हिरावून घेत आहे जे शिक्षणाला एक उत्पादन बनवत आहे. आणि बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांनी हे समजून घेतले पाहिजे की हे सरकार त्यांच्या जखमांवर केवळ मलमपट्टी करण्याचे नाटक करत आहे. या 'इक्विटी रुल'ला संसदेत विधेयकाच्या रूपात आणले जावे अशी आपण मागणी केली पाहिजे. जर आपण अजूनही जागे झालो नाही आणि हा बुद्धिबळाचा खेळ खेळणारा हात ओळखला नाही, तर इतिहास आपल्याला माफ करणार नाही. दिल्लीपासून प्रयागराजपर्यंत आणि पाटण्यापासून ते लखनौपर्यंत, या पाखंडाला ओळखले पाहिजे. संघटित व्हा, कारण जोपर्यंत आपण व्यवस्था बदलण्याऐवजी आपापसात लढत राहू, तोपर्यंत 'शिकाऱ्याचा' विजय निश्चित आहे.

**लेखक : अखिलेश यादव, जेएनयूच्या सेंटर फॉर हिस्टॉरिकल स्टडीजचे संशोधक विद्यार्थी आहेतमराठी रूपांतरण : प्रा. प्रियदर्शन भवरे, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना साभार: द वायर (हिन्दी)**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002